**<u>ठळक बातम्या</u>**

- विकसित भारत जी राम जी योजनेअंतर्गत राज्यांना २५ हजार कोटी रुपयांचा निधी केंद्रीय कृषिमंत्र्यांच्या हस्ते वितरीत

- एलएनजी पुरवठ्यावरचे आपात्कालीन निर्बंध मागे घ्यायचा सरकारचा निर्णय

- व्हेनेझुएलातल्या भूकंपात मृत्यूमुखी पडलेल्यांची संख्या सुमारे ३ हजाराच्या घरात

- विख्यात पंडवानी गायिका पद्मविभूषण तीजन बाई यांचं निधन

**आणि**

- देशभरात पावसाचा जोर कायम, मुंबईसह अनेक ठिकाणी जनजीवन विस्कळीत

**<><><><><>**

विकसित भारत जी राम जी योजनेअंतर्गत केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी आज राज्यांना २५ हजार कोटी रुपयांचा निधी दूरस्थ पद्धतीनं वितरित केला. केंद्र सरकारनं या योजनेतला आपला वाटा दिला असून राज्य सरकारांनीही आपापला वाटा वितरित करावा, असं आवाहन त्यांनी केलं.

***होल्ड... बाईट- शिवराज सिंह चौहान***

विकसित भारत रोजगार हमी आणि आजीविका मोहीम, अर्थात VB-G RAM G कायदा १ जुलैपासून लागू झाला आहे. 'विकसित भारत' या संकल्पनेला अधिक गती देण्याकरता या कायद्याअंतर्गत पुढच्या ५ वर्षांमध्ये देशातल्या २ लाख ८६ हजार ग्रामपंचायतींमध्ये साडेसात लाख कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक केली जाणार आहे, अशी माहितीही त्यांनी यावेळी दिली.

**<><><><><>**

देशात दुसऱ्या आणि तिसऱ्या श्रेणीतली शहरं, तसंच दुर्गम भागांमध्ये विमान प्रवासाला चालना देण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी काल ‘विकसित उडान’ या योजनेच्या दुसऱ्या टप्प्याचा प्रारंभ केला. २८ हजार ८४० कोटी रुपयांच्या या योजनेमुळे १०० पेक्षा जास्त विमानतळं आणि २०० हेलिपॅड्सच्या विकासाला चालना मिळेल, असा विश्वास नागरी विमान

वाहतूक मंत्री राम मोहन नायडू यांनी व्यक्त केला. राजस्थानच्या जोधपूर इथं झालेल्या या कार्यक्रमात जोधपूर विमानतळावर नव्या टर्मिनल भवनाचं उद्घाटनही प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झालं.

<><><><><>

पश्चिम आशियात लागू झालेल्या युद्धविरामानंतर हॉर्मुझच्या सामुद्रधुनीतून ‘एलएनजी’ अर्थात, द्रवरुप नैसर्गिक वायूचा पुरवठा सुरळीत सुरू झाल्यानंतर एलएनजीच्या पुरवठ्यावरचे आपात्कालीन निर्बंध सरकारनं मागे घेतले आहेत. या वर्षीच्या मार्च महिन्यात हे निर्बंध लादले होते.

<><><><><>

सरकारच्या जैवइंधन मिश्रण कार्यक्रमाबाबत होणाऱ्या विधायक टीकेचं स्वागत करायची सरकारची भूमिका आहे आणि आलेल्या सूचनांचा या कार्यक्रमात समावेश करून आवश्यक त्या सुधारणा करू, असं आश्वासन केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंह पुरी यांनी दिलं. राजस्थानात एका कार्यक्रमात ते काल बोलत होते. इथेनॉल ही नवी संकल्पना नसून एका शतकापेक्षा जास्त काळ याचा वापर होत आहे, असं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

ऑस्ट्रेलियासाठी भारत हा आर्थिक क्षेत्रातला महत्त्वाचा भागीदार आहे, असं प्रतिपादन ऑस्ट्रेलियाचे प्रधानमंत्री अँथनी अल्बानेज यांनी केलं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या ८ ते १० जुलै दरम्यान ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर जाणार आहेत. या पार्श्वभूमीवर अल्बानेज यांच्या कार्यालयानं एक निवेदन जारी केलं. भारत ही जगातली चौथी सर्वात मोठी आणि सर्वात वेगानं वाढणारी अर्थव्यवस्था असून या दोन देशांमधलं सहकार्य हे सर्वसमावेशक धोरणात्मक भागीदारीच्या पायावर उभं आहे, असं यात म्हटलं आहे. व्यापार, संरक्षण आणि तंत्रज्ञान क्षेत्रांमधलं सहकार्य हे दोन्ही देशांसाठी फायदेशीर ठरत आहे, हिंद-प्रशांत क्षेत्रात शांतता, स्थैर्य आणि समृद्धीसाठी या दोन देशांमधले संबंध महत्त्वाचे आहेत, असंही निवेदनात नमूद केलं आहे.

<><><><><>

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉक्टर एस. जयशंकर आजपासून १० जुलैपर्यंत कतार, बहारीन, कुवेत आणि ओमान या देशांच्या दौऱ्यावर जात आहेत. यादरम्यान ते या देशांचे परराष्ट्र मंत्री आणि नेत्यांबरोबर बैठका घेतील. भारताचे या देशांबरोबरचे द्विपक्षीय संबंध आणखी बळकट करणं, तसंच स्थानिक घडामोडी आणि सामायिक हिताच्या मुद्द्यांवर विचारांची देवाणघेवाण करणं हा या दौऱ्याचा उद्देश असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

यंदाच्या श्री अमरनाथ यात्रेला उत्साहात सुरुवात झाली असून पहिल्या दोन दिवसांत ३२ हजार ३१३ भाविकांनी अमरनाथाच्या पवित्र गुहेचं दर्शन घेतलं आहे. यात्रेच्या दुसऱ्या दिवशीच २० हजार १४५ भाविकांनी दर्शन घेतलं असून गेल्या वर्षीच्या तुलनेत ही संख्या अधिक आहे. दरम्यान, यात्रेकरूंचा चौथा जथा आज पहाटे जम्मूमधल्या भगवतीनगर यात्रीनिवासातून कडेकोट सुरक्षाव्यवस्थेत रवाना झाला. या टप्प्यावर ६ हजार ७३१ भाविक २९१ वाहनांतून पहलगाम आणि बालटाल या दोन्ही मार्गांनी अमरनाथकडे रवाना झाले. दोन्ही मार्गांवर यात्रेसाठी आवश्यक सुरक्षा आणि सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्याचं प्रशासनानं सांगितलं आहे.

**<><><><><>**

व्हेनेझुएलातल्या दुहेरी भूकंपात मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या २ हजार ९५४ वर गेल्याची माहिती नॅशनल असेंब्लीचे अध्यक्ष होर्हे रॉद्रिगेज यांनी दिली. या दुर्घटनेत १६ हजारांपेक्षा जास्त जण जखमी झाल्याचं, तर जवळपास १६ हजार जण बेघर झाल्याचंही त्यांनी सांगितलं. मदत आणि बचावकार्य अद्याप सुरू आहे. व्हेनेझुएलाच्या हंगामी अध्यक्ष डेल्सी रॉद्रिगेज यांनी ७ दिवसांचा दुखवटा जाहीर केला आहे. २४ जून रोजी ७ पूर्णांक २ दशांश आणि ७ पूर्णांक ५ दशांश रिश्टर स्केलच्या दोन शक्तिशाली भूकंपांनी व्हेनेझुएलाला हादरवून सोडलं होतं.

**<><><><><>**

काँगो या देशात इबोला विषाणूचा प्रादुर्भाव सुरूच असून, आतापर्यंत १ हजार ५२८ रुग्णांची नोंद झाली आहे. यापैकी ४९२ जणांचा मृत्यू झाला आहे. सार्वजनिक आरोग्य अधिकाऱ्यांनी प्रसिद्ध केलेल्या ताज्या अहवालानुसार, २३९ रुग्ण बरे झाले आहेत, तर ६२८

रुग्णांना विलगीकरणात ठेवलं असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. याशिवाय, १८५ संशयित रुग्णांचीही नोंद झाली आहे.

<><><><><>

अमेरिकेच्या अडीचशेव्या स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांनी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना दूरध्वनीवरून शुभेच्छा दिल्या. पुतीन यांचे सहाय्यक युरी युशाकोव्ह यांनी ही माहिती दिली. युक्रेनविरुद्धच्या संघर्षात लवकरात लवकर तोडगा निघाला, तर दोन्ही देशांमधल्या व्यापक सहकार्यासाठी अनुकूल वातावरण निर्माण होईल, असं मत यावेळी ट्रम्प यांनी व्यक्त केल्याचंही ते म्हणाले.

<><><><><>

इंग्लंड आणि भारत यांच्यात सुरू असलेल्या ५ टी-ट्वेंटी सामन्यांच्या मालिकेतल्या दुसऱ्या सामन्यात काल इंग्लंडनं भारताचा ४ गडी राखून पराभव केला आहे. भारताने इंग्लंडसमोर ठेवलेलं १९१ धावांचं लक्ष्य इंग्लंडनं १९ षटकांमध्ये पूर्ण केलं. आता भारत आणि इंग्लंडमधला पुढचा सामना येत्या मंगळवारी नॉटिंघम इथं होणार आहे.

<><><><><>

फिफा विश्वचषक स्पर्धेत फ्रान्सने पॅराग्वेवर १-० असा विजय मिळवून उपांत्य फेरीत प्रवेश केला. फ्रान्सचा कर्णधार किलीयन एम्बापेनं सामन्यातला एकमेव गोल केला. आता उपांत्य फेरीत फ्रान्सचा सामना मोरोक्कोशी होईल. राउंड ऑफ थर्टी टू मधल्या शेवटच्या सामन्यात काल अर्जेंटिनाने काबो वेरदे वर, तर कोलंबियाने घानावर विजय मिळवून राउंड ऑफ सिक्सटीन मध्ये प्रवेश केला.

<><><><><>

विम्बल्डन टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत महिला एकेरीच्या तिसऱ्या फेरीत एलिजे मेर्टन्स हिनं जागतिक क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकावर असलेली एलेना रिबाकीना हिला ७-६, ६-१ अशा थेट सेट्समध्ये पराभवाचा धक्का दिला. तर अलेक्झांड्रा इयाला हिनं तिसऱ्या क्रमांकाची टेनिसपटू इगा श्वियांतेक हिच्यावर ७-६, ६-२ अशी मात केली.

<><><><><>

विख्यात पंडवानी गायिका आणि पद्मविभूषण तीजन बाई यांचं आज निधन झालं. त्या ७० वर्षांच्या होत्या. गेल्या अनेक दिवसांपासून त्या आजारी होत्या आणि त्यांच्यावर उपचार

सुरू होते. आज पहाटे सव्वा तीनच्या सुमाराला त्यांची प्राणज्योत मालवली. ताकदीचा आवाज, रंगमंचावरचा आकर्षक वावर आणि सादरीकरणाच्या वैशिष्ट्यपूर्ण पद्धतीतून त्यांनी पंडवानी या छत्तीसगडच्या लोककलेला वेगळी ओळख मिळवून दिली. त्यांच्या अद्वितीय योगदानासाठी त्यांना पद्मश्री, पद्मभूषण आणि पद्मविभूषण या प्रतिष्ठित पुरस्कारांनी गौरवण्यात आलं होतं.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी तीजन बाईंच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं. भारतीय संस्कृती जागतिक मंचावर नेण्यातलं त्यांचं योगदान सदैव स्मरणात राहील, या शब्दांत राष्ट्रपतींनी त्यांना आदरांजली वाहिली. तीजनबाईंनी भारताची समृद्ध लोकपरंपरा, विशेषतः महाभारताच्या अजरामर गोष्टी जनमानसांपर्यंत नेल्या, असे गौरवोद्गार उपराष्ट्रपतींनी काढले. तीजन बाईंच्या निधनानं कला आणि संस्कृती विश्वाची अपरिमित हानी झाल्याची भावना प्रधानमंत्री मोदी यांनी व्यक्त केली.

**<><><><><>**

महाराष्ट्रात आजही अनेक ठिकाणी जोरदार पाऊस सुरू आहे.

**मुंबईत** आज सोसाट्याच्या वाऱ्यासह कोसळणाऱ्या पावसामुळे अनेक ठिकाणी झाडं उन्मळून पडली. त्यामुळे वाहतूक खोळंबल्यानं जनजीवन विस्कळीत झालं आहे. हार्बर लाईनवर शिवडी स्थानकाजवळ रेल्वे मार्गावर झाड पडल्यानं रेल्वेसेवा खंडित झाली होती**.**

**नवी मुंबई** परिसरात सकाळपासून पावसाचा जोर कायम आहे.

**ठाणे** जिल्ह्यात आज सलग दुसऱ्या दिवशी देखील मुसळधार पाऊस सुरू आहे.

**रत्नागिरी** जिल्ह्यात सुरू असलेल्या पावसामुळे सर्व नद्यांच्या पाणीपातळी वाढली असून आज सकाळी ११ वाजताच्या स्थितीनुसार, खेडमधल्या जगबुडी नदीनं धोका पातळी ओलांडली आहे.

**रायगड** जिल्ह्यात खोपोली इथल्या झेनिथ धबधब्याच्या परिसरात अडकलेल्या शंभराहून अधिक पर्यटकांची सुखरूप सुटका करण्यात आली.

**बुलढाणा, कोल्हापूर आणि सांगली** जिल्ह्यातही पावसाच्या सरी कोसळत आहेत.

**<><><><><>**

भारतीय हवामान विभागानं आज मध्य महाराष्ट्र, गुजरात, कोकण, गोवा, आणि ओदिशासाठी अतिमुसळधार पावसाचा रेड अलर्ट जारी केला आहे. तर छत्तीसगड, पूर्व मध्य

प्रदेश, पूर्व राजस्थान, कर्नाटक, तेलंगणा आणि विदर्भात मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता वर्तवली आहे.

याशिवाय मराठवाडा, नागालँड, मणिपूर, मिझोराम, त्रिपुरा, तामिळनाडू, पुदुच्चेरी, काराईकल, उत्तराखंड आणि पश्चिम राजस्थानमध्येही पावसाचा जोर कायम राहण्याची शक्यता आहे.

//<><><><><>//